# "परिशिष्ट-अ"

(शासन निर्णय क्र. इबीसी २०१७/प्र.क्र.५२४ /शिक्षण -१, दिनांक २९ जानेवारी,२०१८ चे सहपत्र)

## सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षाकरीता शिष्यवृत्ती / शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क इ. ची अनुज्ञेय रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँन्क खात्यावर मिळण्यासाठी विद्यार्थी व पालकाने द्यावयाचे बंधपत्र (Indemnity Bond)

### (अ) महाविद्यालयाने द्यावयाचे बंधपत्र (Indemnity Bond)

(I) श्री. ---------------------------------------------------------- या अर्जदाराने सोबतच्या बंधपत्रात (Indemnity Bond) नमूद केलेली सर्व माहिती, त्याच्या कुटूंबाचे सर्व मार्गाने मिळणारे वार्षिक उत्पन्न, तो सध्या शिकत असलेल्या अभ्यासक्रमाची माहिती, शैक्षणिक माहिती, त्याचे वसतिगृह, वसतिगृहा बाहेर राहण्याची माहिती शुल्करचना, जातीचे प्रमाणपत्र इ. तपशिल त्याच्या मुळ कागदपत्रांवरुन पूर्णपणे तपासण्यात आला असून, अर्जात नमूद केलेला तपशिल बरोबर आहे. त्यानुसार, मी, श्री / श्रीमती ------------------------------------------------------------ ( प्राचार्याचे नाव ) -----------------------------------------------------------------या शैक्षणिक संस्थेच्या महाविद्यालयात प्राचार्य म्हणून कार्यरत असुन, त्या अधिकारात **उपरोक्त** विद्यार्थ्याची शिष्यवृत्ती / शिक्षण शुल्क परिक्षा शुल्क इतर शुल्क मंजूर करण्याकरीता शिफारस करीत आहे.

(II) मी निम्नस्वाक्षरीत हमी देतो की, अर्जदाराची शिक्षण शुल्क व इतर शुल्काची रक्कम जी महाविद्यालयाकडे सुपूर्द केलेली आहे, ती ज्या प्रयोजनासाठी दिलेली आहे, त्या विशिष्ट प्रयोजनासाठी त्याचा विनियोग करीन आणि त्याबाबीचे हिशोब ज्या प्राधिकाऱ्याने ही तरतूद सुपूर्द केलेली आहे, त्या प्राधिकाऱ्याकडे नियमितपणे पाठवेन. विद्यार्थी महाविद्यालय सोडून गेल्यास किंवा त्याने विनापरवानगी अभ्यासक्रमात बदल केल्यास किंवा अन्य कोणत्याही अनियमिततेमुळे त्याचा प्रवेश रद्द झाल्यास, त्यास मंजूर करण्यात आलेली शिष्यवृत्ती / शिक्षण फी, परिक्षा फी व इतर शुल्काची रक्कम सरकारी लेख्यात जमा झाल्याशिवाय त्याचा शाळा / महाविद्यालय सोडल्याचा दाखला जारी करणार नाही. त्याची संपूर्ण जबाबदारी प्राचार्य या नात्याने माझ्याकडे राहील.

(III) विद्यार्थ्याच्या अर्जामध्ये नमूद केलेली माहिती, अर्जदाराने दिलेल्या मुळ कागदपत्राचे आधारे मी तपासलेली आहे. तसेच अर्जदारानी सादर केलेल्या कागदपत्रांच्या मूळ प्रती तपासलेल्या असून सादर केलेल्या कागदपत्रामध्ये कोणताही बदल, खाडाखोड, दुरुस्ती वा फेरफार आढळून आलेला नाही.

(IV) मी निम्नस्वाक्षरीत प्रमाणित करतो की, अर्जदार हा आमचे महाविद्यालयामधील नियमित विद्यार्थी आहे. त्याने कोणत्याही अन्य महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतलेला नाही, तसेच त्याची सरासरी उपस्थिती ७५% पेक्षा अधिक आहे. तसेच सदर विद्यार्थ्याकडून महाविद्यालयाने कोणतेही शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क व इतर अनुज्ञेय शुल्क घेतलेले नाही.

Scanned by CamScanner

(V) आमचे महाविद्यालय हे मान्यता प्राप्त आहे, ते अनुदानित / विनाअनुदानित आहे, मान्य झालेले अभ्यासक्रम हे संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यांनी मान्यता दिलेले आहेत. प्रत्येक अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता ही सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेल्या मान्यतेनुसारच असुन, त्या प्रवेश क्षमतेच्या अधिन राहून मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे अर्ज संबंधित सक्षम कार्यालयास फॉरवर्ड केले आहेत. त्यांची शिक्षण शुल्क परिक्षा शुल्क व इतर शुल्क सुध्दा, संबंधित सक्षम प्राधिकारी / विद्यापीठ यांनी मान्य केल्याप्रमाणेच असून ती अवास्तव किंवा अवाजवी नाहीत. शासन / विद्यापीठ / सक्षम प्राधिकारी यांचे प्रचलित नियम व अटी यांचे पालन करुन व त्यामधील नियम, अटी व शर्तीच्या अधिन राहून विद्यार्थ्यांचा अर्ज योग्य व नियमानुसार असून, त्याची शिष्यवृत्ती / शिक्षण शुल्काची देय रक्कम, संबधितांचे आधार संलग्न बॅक खात्यावर जमा होणेसाठी शिफारस करण्यात येत आहे. त्यामध्ये अनियमितता उणीवा व गैरप्रकार झाल्यास त्याची सर्व जबाबदारी ही महाविद्यालयाची असेल.

जावक क्रमांक --------------
दिनांक ---------------
ठिकाण ------------------

प्राचार्याची स्वाक्षरी---------------------------------------
संपूर्ण नाव ---------------------------------------
महाविद्यालयाचा शिक्का

**टिप :- प्रस्तावासोबत विद्यार्थी/पालकांनी व महाविद्यालयांनी द्यावयाचे बंधपत्र प्राचार्यांनी एकत्रितच संलग्न करुन द्यावयाचे आहे.**

Scanned by CamScanner

## (ब) विद्यार्थी व पालकांनी द्यावयाचे बंधपत्र (Indemnity Bond):-

१) मी / आम्ही खाली सही करणार / करणारे प्रतिज्ञापन करतो की, शिष्यवृत्ती मिळण्याबाबत शासनाने विहीत केलेल्या अटी व शर्ती मला / आम्हाला मान्य आहेत. अर्जात वरीलप्रमाणे नमूद केलेली सर्व माहिती पूर्णपणे सत्य आहे. सदरची माहिती खोटी अथवा अपुरी आढळल्यास भारतीय दंडविधाना प्रमाणे होणाऱ्या दंडास / शिक्षेस मी / आम्ही पात्र आहे / आहोत. अर्जात नमूद केलेल्या माहितीपैकी कोणतीही माहिती वा निवेदन चुकीचे आढळून आल्यास सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला निर्णय अंतिम असेल व तो माझ्यावर / आम्हावर बंधनकारक असेल, अशी मी / आम्ही हमी देतो. जर शिष्यवृत्तीची, शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्काची रक्कम अनुज्ञेय रक्कमेपेक्षा अधिक मिळाली तर मी / आम्ही ती शासनास जमा करु, अशी जास्तीची अथवा अन्य कारणामुळे वसूल करण्यात येणारी रक्कम मी / आम्ही पूर्णपणे शासनास परत करण्याची हमी देतो.

२) माझ्या कुटुंबाच्या उत्पन्नाची व जातीची अर्जात नमूद केलेली माहिती खोटी आढळल्यास माझ्या / माझ्या पाल्याच्या विरुध्द होणाऱ्या कारवाईस मी / आम्ही स्वत: जबाबदार राहू.

३) मी अर्जासोबत जोडलेली सर्व कागदपत्रे, मी सक्षम अधिकाऱ्याकडून / प्राधिकाऱ्याकडून प्राप्त केलेली असून, ती कागदपत्रे खरी असून योग्य मार्गाने मिळविलेली आहेत. त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा फेरफार / दुरुस्ती / बदल केलेला नाही. सदरील कागदपत्रे, प्रमाणपत्रे खोटी अथवा नकली नाहीत हे मी सत्य प्रतिज्ञेवर लिहून देतो. अर्जासोबत जोडलेली कागदपत्रे, प्रमाणपत्रे खोटे अथवा बनावट आढळल्यास त्यास मी / आम्ही पुर्णत: जबाबदार असून त्यासाठी भारतीय दंड विधान कायदा कलम १९९ व २०० नुसार लागू होणाऱ्या शिक्षेस मी/आम्ही पात्र राहू, याची मला/आम्हाला पुर्ण जाणीव आहे.

४) सन २०१७-१८ या वर्षाची शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क व इतर शुल्काची रक्कम माझ्या आधार संलग्न बॅन्क खात्यावर जमा होताच, त्यापैकी महाविद्यालयास देय असलेली शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काची रक्कम सात दिवसात महाविद्यालयात जमा करुन त्याची रितसर पावती प्राप्त करुन घेण्याची माझी / आमची जबाबदारी असेल. शुल्क महाविद्यालयास जमा न केल्याने भविष्यात उदभवणा-या परिणामास मी / आम्ही वैयक्तीक जबाबदार असु असे प्रतिज्ञापुर्वक हमीपत्र / बंधपत्र मी / आम्ही सादर करीत आहोत.

ठिकाण :

दिनांक :

( अर्जदाराच्या वडीलांची / पालकाची सही व पुर्ण नाव ) ( अर्जदाराची सही व पूर्ण नाव )

Scanned by CamScanner